क्र. का.६/सीआर २०४८/परिपत्रक/२६५६-९६
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे कार्यालय, पुणे - १
दिनांक १२.१.१९८६

**परिपत्रक :-**

**विषय :- महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या स्थानिक तपासणी अहवालावरील अभिप्रायाबाबत...**

या कार्यालयाच्या असे लक्षात आले आहे की, महालेखापाल यांनी काढलेल्या स्थानिक तपासणी अहवालातील परिच्छेदावर अभिप्राय वेळेवर या कार्यालयाकडे पाठविले जात नाहीत. अभिप्राय हे महालेखापाल यांच्या आक्षेपांचे नीट परिशीलन न करता दिले जातात. अभिप्रायामध्ये स्पष्टीकरणात्मक खुलासा आहे की, सह जिल्हा निबंधक यांचे अभिप्रायानुसार आक्षेप अमान्य केला असता, महालेखापाल यांचेकडून फेरविचारणी झाली तर मात्र सह जिल्हा निबंधक हे मुळ अभिप्रायाशी विसंगत असे अभिप्राय देतात. कधी कधी सह जिल्हा निबंधक यांचे अभिप्रायानुसार आक्षेप मान्य केला असतांना नंतर असे आढळते की, प्रत्यक्ष दस्तऐवज हे महालेखापाल यांनी घेतलेल्या आक्षेपाशी सुसंगत नसतात. तरीही सह जिल्हा निबंधक यांचे अभिप्रायामुळे आक्षेप मान्य केलेले असतात. अशाप्रकारे सांगोपांग विचार न करता व नीट लक्ष न घालता अभिप्राय दिल्याने कामाचा गुंता वाढत जातो व परिणामतः लोकलेखा समितीपुढे जबाब देणे नोंदणी महानिरीक्षक यांस अवघड होवून बसते. तरी सर्व सह जिल्हा निबंधक यांनी आक्षेपांची व आक्षेपांतर्गत दस्तऐवजांची नीट छाननी करुन अभिप्राय दयावेत की ज्यायोगे त्यावर आधारीत नोंदणी महानिरीक्षक यांनी प्रथमतः दिलेल्या सुचना हया अंतिम स्वरुपाच्या ठराव्यात.

वरील सुचनांचे पालन काटेकोरपणे न झाल्यास कडक कारवाई करण्याची पावले उचलावी लागतील.

सही /xxxx
(शा. भा. फाटक)
कार्यासन अधिकारी क्र. ६ व सहाय्यक
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे -१

सर्व सह जिल्हा निबंधक व दुय्यम निबंधक मुंबई व बांद्रा यांस सस्नेह अग्रेषित नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी यांसी सस्नेह अग्रेषित.